शासनाच्या नियमानुसार अशा बाळाचं नाव त्याच्या नोंदणी दिनांकापासून १२ महिन्यानंतर पण १५ वर्षांच्या आत रजिस्टरमध्ये नोंदविता येते. त्याच्या आई–वडिलांनी दिलेल्या माहितीनुसार ते नोंदविता येतं. मात्र त्यासाठी विलंब शुल्क (रु ५) आकारले जाते. ही मुदत पुढीलप्रमाणे ठरवली जाते.

बालकाच्या जन्माची नोंद घटना घडल्यापासुन २१ दिवसाचे आत त्याच्या / तिच्या नावाशिवाय सुध्दा करण्याची तरतुद कायद्यात आहे.

१) जर अशी नोंदणी जन्म आणि मृत्यू नियम (दुरुस्ती १९८५) लागू होण्यापूर्वी केली असेल तर त्या तारखेपासून किंवा

२) जर अशी नोंदणी जन्म आणि मृत्यू नियम (दुरुस्ती १९८५) लागू झाल्यानंतर केली असेल तर त्या नोंदणीच्या तारखेपासून पण कलम २३ च्या पोटकलम ४ मधील तरतूदीनुसार.

### तुम्ही हे करू शकता —

अ) जर नोंदणीचे रजिस्टर तुमच्याजवळ असेल तर तुम्ही मुलाचे नाव संबंधित नमुन्यामधील योग्य त्या रकान्यात ठरवून देण्यात आलेले विलंब शुल्क घेऊन नोंदवू शकता.

ब) जर नोंदणीचे रजिस्टर तुमच्याजवळ नसेल आणि संबंधित व्यक्तीने तोंडी माहिती दिली तर योग्य ती माहिती लिहून तुम्ही एक कागद तुम्ही त्या व्यक्तीकडून ठरवून दिलेले विलंब शुल्क घेऊन विनिर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्याकडे नोंदणीसाठी पाठवा.

सदर मुलाचे आई–वडील किंवा पालक यांनी नावाची नोंद करताना तुम्हाला त्यांच्याकडे असलेल्या जन्माच्या नोंदीची माहिती जी त्यांना कलम १२ नुसार मिळाली असेल किंवा जन्माच्या दाखल्याची प्रमाणित प्रत जी त्यांना कलम १७ नुसार मिळाली असेल ती दाखवू शकतात व त्या नुसार तुम्ही मुलाच्या नावाचा समावेश करावा आणि उपकलम (१) च्या भाग (ख) अन्वये पुढील कारवाई करावी.

या अधिनियमान्वये बाळाची जन्माची नोंद नावासह किंवा नावाशिवाय २१ दिवसांपर्यंत करण्याची मुदत असली तरी जन्म नोंदणी दिनांकापासून १ वर्षापर्यंत बालकाच्या नावाची नोंद विनाशुल्क करता येते व त्यानंतर १५ वर्षानंतर विहीत शुल्क (रु ५) भरून करता येऊ शकते; परंतु या मुदतीनंतर मात्र जन्माच्या नोंदीत नावाचा समावेश करता येत नाही. कायद्यातील ही बाब तुम्ही लोकांच्या नजरेला स्पष्ट आणायला हवी.

## नोंदीत दुरुस्ती करणे किंवा नोंद रद्द करणे (कलम १५)

सर्वसाधारणपणे जन्म आणि मृत्युच्या नोंदीत कोणताही बदल करण्यास परवानगी दिली जात नाही. पण काही विशिष्ट परिस्थितीत या नोंदीत दुरुस्ती करण्याची किंवा ती रद्द करण्याची या अधिनियमात तरतूद करण्यात आली आहे. नोंदीत दुरुस्ती करणे अथवा नोंद रद्द करणे हा विषय अधिनियमाच्या कलम १५,राज्य नियम ११ मध्ये स्पष्ट करण्यात आला आहे. अधिनियमाच्या या भागात या संदर्भात होणाऱ्या चुका आणि नोंदीतील दुरुस्ती किंवा नोंदी रद्द करणे याबाबतची चर्चा करण्यात आली आहे. या संदर्भातील चुकांचे प्रामुख्याने तीन प्रकारात वर्गीकरण करण्यात आले आहे. त्या अशा: लेखनातील किंवा औपचारिक चुका, मजकुरातील चुका आणि हेतूपुरस्सर वा अयोग्यपध्दतीने केलेली नोंद.

**१) लेखनातील किंवा औपचारिक चुका, म्हणजेच अनवधनाने / निष्काळजीपणामुळे किंवा मुद्रणदोषामुळे झालेली चूक:**

उदाहरणार्थ –

एका नवजात अर्भकाचे नाव मुन्नीऐवजी मोनी नोंदविले गेले. अशा स्थितीत निबंधक स्वत:ची खात्री झाल्यानंतर मूळ नोंदीतील नावामध्ये काहीही बदल न करता नोंदणी रजिस्टरच्या त्या पानावरील समासामध्ये नोंद करू शकतो. समासामध्ये केलेल्या नोंदी खाली स्वाक्षरी करून तो दुरुस्ती दिनांक टाकेल.

**२) मजकुरातील चूक जसे संबंधित व्यक्तिची ओळख न पटल्यामुळे झालेली चुक :–**

जर एखादी व्यक्ती एखाद्या नोंदीच्या मजकुरात चूक असल्याचे खात्रीने सांगत असेल तर निबंधक त्या चुकीचे स्वरूप व वस्तुस्थिती बाबत माहिती असणाऱ्या दोन प्रतिष्ठित व्यक्तींकडून निवेदन घेतल्यानंतर कलम १५ मधील तरतुदीनुसार दुरुस्ती करू शकतो.

उदाहरणार्थ –

**अ)** नोंद करताना एखादे अर्भक मुलगी असताना ती मुलगा आहे असे सांगितले गेले, तर निबंधक त्यात दुरुस्ती करू शकतो. परंतु त्यासाठी संबंधीत व्यक्तीने त्यातील चूक निदर्शनास आणून वस्तुस्थिती स्पष्ट करायला हवी. त्याचबरोबर दोन विश्वासार्ह व्यक्तींकडून या घटनेची माहिती व वस्तुस्थिती घ्यायला हवी. निबंधकाने या नोंदीतील दुरुस्ती आणि त्याबाबतचा सर्व तपशील राज्य शासनाला अथवा शासनाने नेमलेल्या अधिकाऱ्याला कळवायला हवा.

**ब)** रुग्णालयात असलेल्या एका जन्माच्या घटनेच्या वेळी तेथील उपस्थित नातेवाईकाने बाळाच्या आईचे नाव सांगताना तिचे टोपण नावच सांगितले. नोंदणी झाल्यानंतर काही दिवसांनी आईच्या नावात दुरुस्ती करण्याची मागणी करण्यात आली. या अधिनियमानुसार नावात बदल करण्यास परवानगी नसली तरी निबंधकाने आईच्या नावाची चुकीची नोंद करण्यात आल्याबद्दल स्वत:ची खात्री करून घ्यावी. या संदर्भातील समाधानकारक पुरावे दिले गेल्यास त्याने नवीन नावाचा समावेश करावा आणि त्यापुढे 'उर्फ' असा शब्द लिहावा. त्यानंतर निबंधकाने त्या नोंदीतील माहिती, झालेली चूक आणि करण्यात आलेली दुरुस्ती राज्य शासनाला किंवा राज्य शासनाने नेमलेल्या अधिकाऱ्याला कळवावी.

**३) हेतुपुरस्सर / गैरप्रकाराने वा अयोग्य पध्दतीने केलेली नोंद –**

निबंधकाची अशी खात्री झाली की, जन्म आणि मृत्युच्या रजिस्टरमधील एखादी नोंद हेतुपुरस्सर किंवा अयोग्य पद्धतीने झाली, तर त्याने मुख्य निबंधकांनी या संदर्भात कलम २५ खाली नेमलेल्या अधिकाऱ्याला या प्रकाराबाबतचा अहवाल द्यावा. त्यानंतर संबंधित अधिकाऱ्याचे म्हणणे ऐकून घेऊन त्याने योग्य ती कारवाई करावी.

उदाहरणार्थ –

नोंदणीचा शोध घेताना असे आढळून आले की, जुळ्या बालकांच्या जन्माची नोंद एकाच फॉर्मवर करून घेण्यात आली आणि त्या दोघांनाही एकच नोंदणी क्रमांक देण्यात आला. मात्र फॉर्मवर शेरा देताना या घटनेत जुळ्या मुलांचा जन्म झाला असे लिहिण्यात आले. अशा स्थितीत निबंधकाने ही नोंद रद्द करून त्या दोन घटना असल्याची नव्याने नोंद करावी.

अशा प्रकारे या नियमानुसार कोणत्याही प्रकरणातील नोंदीत दुरुस्ती केली गेली किंवा ती रद्द केली गेली तर कायद्याचा कलम ८ किंवा कलम ९ नुसार माहिती ज्या व्यक्तीने ही माहिती दिली असेल त्या व्यक्तीच्या कायमच्या पत्त्यावर ही माहिती पाठवायला हवी.

लक्षात ठेवा – या कायद्यानुसार दुरुस्तीसाठी किंवा नोंद रद्द करण्यासाठी कुठलेही शुल्क आकारता येणार नाही

**३.अ.११** नोंदणी रजिस्टरमधील दुरुस्ती आणि ती नोंद रद्द करण्यामागील संभाव्य कारणे आणि सदर कार्यवाही कोणी करावी या संबंधीची माहिती खालील कोष्टकात दिली आहे.

| संभाव्य कारणे | जबाबदार कोण ? | शेरा |
|---|---|---|
| जन्म आणि मृत्युच्या नोंदणी रजिस्टरमधिल चुका निष्काळजीपणामुळे, मजकुरातील चुकीमुळे किंवा गैरहेतुने झालेल्या असतात.<br>**उदाहरणार्थ :**<br>नावातील चुक, लिंगबदल, आईच्या किंवा वडिलांच्या नावातील बदल, टोपणनाव नोंदविणे, जन्म आणि मृत्युच्या घटनेचे ठिकाण चुकीचे नोंदविणे, स्वार्थी हेतुने चुकीची नोंद हेतुत: करणे, आरोग्य कर्मचाऱ्याच्या चुकांमुळे अर्भकाच्या लिंगाची चुकीची नोंद करणे, इत्यादी | संबंधित नोंदणी केंद्रातील निबंधक यांनी निष्काळजीपणामुळे झालेल्या चुकांबाबत स्वत:ची खात्री करुन घेऊन दुरुस्ती करावी व त्याची माहिती जिल्हा किंवा मुख्य निबंधकांना द्यावी. गैरहेतुने केलेल्या चुकीच्या नोंदीबाबत योग्य अधिकाऱ्यांकडुन संमती मिळाल्यानंतरच दुरुस्ती केली जावी. | निबंधक त्याचे / तिचे समाधान झाल्यास नोंदणीत दुरुस्ती करु शकतो. अशी दुरुस्ती करतांना त्याने मुळ नोंदीत कोणतीही खाडाखोड करु नये. त्याने ती दुरुस्ती, फॉर्मच्या समासामध्ये नोंदवावी आणि त्याखाली दुरुस्ती किंवा नोंद रद्द केल्याची तारीख लिहावी व स्वाक्षरी करावी.<br><br>चुकीच्या नोंदीबद्दल खुलासा केला आणि त्याबाबत दोन विश्वासार्ह व्यक्तिंची संमती असल्याचे स्पष्ट केले तर निबंधक नोंदीत दुरुस्ती करु शकतो किंवा ती रद्द करु शकतो. अशी दुरुस्ती केल्याची किंवा नोंद रद्द केल्याची माहिती, त्या नोंदीबद्दलची माहिती देणाऱ्यास कळविणे बंधनकारक आहे. |

## शंका आणि खुलासा

| क्रमांक | शंका | खुलासा |
|---|---|---|
| १) | मुलाच्या जन्माच्या नोंदणीनंतर आई–वडिलांनी त्यांच्या नावात बदल केला आणि तो गॅझेटमध्ये प्रसिध्द झाला तर त्याचा समावेश जन्म नोंदणीत करता येतो का ? | असे बदल अधिनियमाच्या कलम १५ मध्ये अंतर्भूत करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे नावातील बदलांचा जन्म नोंदणीत समावेश करण्याची गरज नाही. |
| २) | जर एखाद्याच्या मृत्यु कलकत्त्यात झाला, पण तो राजस्थानातील जयपुरचा रहिवाशी असल्याने त्याच्या मृत्युचा नोंद तेथे केली गेली. त्यानंतर ही बाब निबंधकांच्या लक्षात आली. त्याने त्या कुटुंबाला घटना जिथे घडली तिथेच तिचा नोंद करायला हवी ही बाब लक्षात आणून दिली. या संदर्भात काय करायला हवे ? | अशा प्रकरणात निबंधकाने जयपुर येथील नोंद रद्द करावी. नियमानुसार त्याने माहिती देणाऱ्यांना ही नोंद रद्द केल्याचे कळवावे. त्याचप्रमाणे ही नोंद कलकत्त्यात करण्याचा सल्ला द्यावा. |
| ३) | एखाद्या व्यक्तिचे घरगुती किंवा टोपण नाव दाखल्यात नोंदविण्यात आले आहे. आता ते बदलण्याची गरज आहे. यासाठी निबंधकाने कोणती कार्यपध्दती अवलंबावी ? | जन्माचे नोंदवहीत खरे नाव लिहीलेले नसेल तर 'उर्फ' असा उल्लेख करुन त्याचा समावेश रजिस्टरमध्ये राज्य शासनाने केलेल्या नियमानुसार करता येतो. |
| ४) | जन्म किंवा मृत्युचे प्रमाणपत्र डिजीटल सहीने देता येते का ? तसे असेल तर डिजीटल सही करण्याचा अधिकार कोणाला आहे ? | आय टी कायद्याच्या कलम ५ प्रमाणे डिजीटल सही असलेली जन्म आणि मृत्यु प्रमाणपत्रे ग्राह्य मानली जातात. अर्थत त्यात प्रत्येक निबंधकाच्या कार्यक्षेत्राचे पालन व्हायला हवे. |
| ५) | निबंधकाची बदली झाली किंवा तो सेवानिवृत्त झाला तर पुर्वीच्या निबंधकाने डिजीटल स्वाक्षरी केलेले दाखले वापता येतील का ? | अशा परिस्थितीत विद्यमान निबंधकांची डिजीटल स्वाक्षरी मिळेपर्यंत त्याच्या लेखी स्वाक्षरीने दाखले दिले जावेत. या संदर्भात मोठे कार्यक्षेत्र असलेल्या एकाच अधिकाऱ्याची डिजीटल स्वाक्षरी घेतली जावी. |